ePaper
सुपेकरांची मुजोरी, PIकडून पैसे, दिवाळीला सोनं...दमानियांचा गौप्यस्फोट
| वर्ष - 8 | अंक - 300 | UDYAM-MH-26-0158827 |



# महाईन्यूज ™

**आतील पानांत**
- विराट कोहलीविरुद्ध पोलीस तक्रार
- श्रेयसनं मारलेला तो फटका गुन्हा
- एलॉन मस्कचं डोकं ठिकाणावर नाही
- ऑपरेशन सिंदूर'बद्दल फेसबुकवर पोस्ट

www.mahaenews.com | शनिवार, दि. 7 जून 2025 | पुणे, पिंपरी-चिंचवड आवृत्ती | mahaenews.com | लढाई सत्याची... लोकशाहीच्या हक्काची!

## आदित्य ठाकरेंचा 'जिगरी दोस्त' अभिनेता डिनो मोरिया, भाऊ सँटिनो यांच्या घरी 'ईडी' चे छापे

# 'टार्गेट' आदित्य ठाकरे!

## मित्र केतन कदम, जय जोशी देखील रडारवर



| मुंबई | प्रतिनिधी | महाईन्यूज

**मिठी नदी गाळ उपसा घोटाळाप्रकरणी 'ईडी' ने अचानक कारवाई केली. प्रसिद्ध अभिनेता आणि कॉन्ट्रॅक्टर डिनो मोरिया, त्याचा भाऊ सँटिनो 'ईडी' च्या फेऱ्यात अडकले असून मुंबईत १२ ठिकाणी छापे टाकण्यात आले. त्यांचे मित्र केतन कदम आणि जय जोशी हे देखील 'ईडी' च्या जाळ्यात अडकले आहेत. हा घोटाळा सुमारे ६५ कोटी रुपयांचा असून ही चौकशी साडेआठ तास चालली. दरम्यान, मोरिया बंधू हे रडारवर असले तरी युवानेते आदित्य ठाकरे हेच खरे 'लक्ष्य' आहे, असे राजकीय वर्तुळात बोलले जात आहे.**

### तब्बल साडेआठ तास छापेमारी.. मिठी नदी गाळ उपसाप्रकरणी 65 कोटी घोटाळ्याचा आरोप !

### डिनोचे चित्रपट करिअर धोक्यात..

डिनोचा पहिला चित्रपट काही विशेष चालला नाही. त्यानंतर तो २००२ साली बिपाशा बसूसोबत 'राज' या चित्रपटात झळकला. या चित्रपटाने त्याला रातोरात स्टार बनवले. या चित्रपटाने बॉक्स ऑफिसवर प्रचंड कमाई केली होती. मात्र, या यशानंतरही डिनोचे अभिनय क्षेत्रातील करिअर स्थिरावू शकले नाही. यानंतर तो अनेक फ्लॉप चित्रपटांमध्ये दिसला. त्यामुळेच त्याने अभिनयापासून काहीसा ब्रेक घेतला. बऱ्याच वर्षांनंतर मोठ्या पडद्यापासून दूर राहिल्यानंतर, डिनोने २०२१ साली 'द एम्पायर' या वेब सीरिजमधून दमदार पुनरागमन केले. आता तो अभिनेता अक्षय कुमारसोबत 'हाउसफुल 5' मध्ये दिसणार आहे. परंतु मध्येच अशा प्रकारची चौकशी आणि गुन्हे दाखल झाल्यामुळे डिनो चे चित्रपट करिअर मात्र धोक्यात आले आहे.

### आदित्यचा मित्र डिनो मोरिया मोठे नाव..

अभिनेता डिनो मोरिया याच्या घरी मुंबईत ईडीचे छापे पडले आहेत. मिठी नदी गाळ उपसा प्रकरणी झालेल्या घोटाळ्यात ईडीने ही कारवाई केली आहे. वरळीत केतन कदम आणि कांदिवलीमध्ये जय जोशी यांच्या घरी देखील ईडीने कारवाई केली. या छापेमारीत 'ईडी' ला कोणते पुरावे मिळाले, हे महत्त्वाचे ठरणार आहे.

### हे सर्व प्रकरण आहे तरी काय?

या संपूर्ण प्रकरणात डिनो मोरिया कसा अडकला, हे देखील महत्वाचे आहे. याच प्रकरणात केतन कदम हा अटकेत आहे. तोच या प्रकरणातील मुख्य आरोपी आहे. डिनो मोरिया हा केतन कदम याला गेली वीस, पंचवीस वर्षे ओळखतो. डिनोचा भाऊ सँटिनो आणि केतनची पत्नी 'युबो राईड्स कंपनी' त संचालक आहेत. पूर्वी ही कंपनी 'फूड कंपनी' होती. नंतर या कंपनीने 'गेट वे ऑफ इंडिया' जवळ चालणाऱ्या बग्गीचे काम घेतले. केतन याने डिनोच्या खासगी बँक खात्यात १४ लाखांहून अधिक पैसे पाठवले असल्याचे तपासात समोर आले आहे. यानंतर डिनोने काही पैसे 'युबो राईड्स कंपनी' च्या खात्यात वळवले. हे पैसे आर्थिक अपहार करून डिनोला पाठवण्यात आल्याचा संशय 'ईओडब्ल्यु' ला आहे. याच आधारावर डिनो मोरिया याची चौकशी सुरू आहे. या कंपनीचा एक भागीदार असलेल्या जय जोशी यांनी मात्र नंतर कंपनीचा राजीनामा दिल्याची नोंद आहे.

### डिनोचा नवीन मल्टीस्टारर चित्रपट..

डिनो सध्या त्याचा नवीन मल्टीस्टारर चित्रपट 'हाऊसफुल-5' मुळे चर्चेत आहे. मात्र, त्याचा, सिनेमा रिलीज झालेला असतानाच डिनोची मिठी नदीच्या गाळ घोटाळा प्रकरणात चौकशी सुरु होती. मात्र, आता या प्रकरणात 'ईडी' ने एन्ट्री घेतली असून डिनो अडचणीत तर आला आहेच, पण त्याच्या सर्व मित्रांना त्याने अडचणीत आणले आहे.

### ईओडब्ल्यू कडून दोनवेळा चौकशी..

डिनोची 'ईओडब्ल्यू' कडून आधीच दोन वेळा चौकशी झाली आहे. उद्धव ठाकरे गटाचे नेते आदित्य ठाकरे यांचे निकटवर्तीय म्हणून ओळखल्या जाणाऱ्या डिनोची यापूर्वीच मुंबई पोलिसांच्या आर्थिक गुन्हे शाखेने ही चौकशी केली. आता, ईडी छाप्यादरम्यान हस्तगत करण्यात आलेली आर्थिक कागदपत्रे आणि इतर पुरावे तपासत आहे. या घोटाळ्यात कोण सामील आहे? याची तपासणी होत आहे. ही कारवाई मनी लॉन्ड्रिंग प्रतिबंधक कायद्याअंतर्गत करण्यात आली आहे.

### मिठी नदी गाळ घोटाळा..

या गाळ घोटाळा प्रकरणात मुंबई महानगरपालिका आणि कंत्राटदारांविरुद्ध गुन्हा यापूर्वीच नोंदविण्यात आला आहे. एकूण १३ जणांविरोधात मिठी नदी घोटाळ्याप्रकरणी गुन्हा दाखल केला होता. ईडीचा संशय आहे की, विशेष ड्रेजिंग उपकरणे भाड्याने घेण्यासाठी टेंडर प्रक्रियेत छेडछाड करण्यात आली आणि ठराविक पुरवठादारांना फायदा मिळवून देण्यात आला. यामुळे, मुंबई महानगरपालिकेला मोठा आर्थिक तोटा सहन करावा लागला. मिठी नदी, जी मुंबईतून वहात जाऊन अरबी समुद्रात मिळते, ती नदी आणि नागरिक गाळ आणि पुराच्या समस्यांमुळे त्रस्त आहेत.

### अक्षय कुमारच्या सिनेमात काम

प्रसिद्ध अभिनेता अक्षय कुमारच्या 'हाउसफुल-5' चित्रपटात काम करणारा अभिनेता डिनो सध्या वादाच्या भोवऱ्यात अडकला आहे. डिनोने आपल्या करिअरची सुरुवात मॉडेलिंगपासून केली होती. त्याचदरम्यान त्याला 'प्यार में कभी कभी' या चित्रपटाची ऑफर मिळाली आणि त्याच्या अभिनय प्रवासाला सुरुवात झाली

ePaper

## सुपेकरांची मुजोरी, Pकडून पैसे, दिवाळीला सोनं...दमानियांचा गौप्यस्फोट

| वर्ष - 8 | अंक - 300 | UDYAM-MH-26-0158827 |



महाईन्यूज ™

### आतील पानांत


- विराट कोहलीविरुद्ध पोलीस तक्रार
- श्रेयसनं मारलेला तो फटका गुन्हा
- एलॉन मस्कचं डोकं ठिकाणावर नाही
- ऑपरेशन सिंदूर'बद्दल फेसबुकवर पोस्ट


www.mahaenews.com | शनिवार, दि. 7 जून 2025 | पुणे, पिंपरी-चिंचवड आवृत्ती | mahaenews.com | लढाई सत्याची... लोकशाहीच्या हक्काची!

## पुण्यात महायुतीतच बंडखोरीची मोठी शक्यता

# पुण्यात महायुतीची वाट बिकट?

## जागावाटपाच्या फॉर्म्युल्याची शहरात जोरदार चर्चा

। पुणे । प्रतिनिधी । महाईन्यूज

**स्थानिक स्वराज्य संस्थांच्या आगामी निवडणुका एकत्र लढविण्याचा निर्णय महायुतीने घेतला असून, पुणे महापालिकेतील जागावाटपाच्या 'फॉर्म्युल्या'वर उच्चपदस्थांमध्ये एकमत झाल्याचा दावा स्थानिक नेत्यांकडून करण्यात येत आहे. महापालिकेतील संभाव्य १६४ जागांपैकी ११० जागा भारतीय जनता पक्ष, तर ४२ जागा राष्ट्रवादी काँग्रेस लढविणार असल्याची चर्चा आहे. शिवसेना आणि रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडिया (आठवले गट) यांना अनुक्रमे सात आणि पाच जागा देण्यात येणार असल्याने पुण्यात महायुतीतच बंडखोरीची मोठी शक्यता वर्तविण्यात येत आहे.**



स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका महायुती एकत्र लढेल. ही कार्यकर्त्यांची निवडणूक आहे. त्यामुळे अपवादात्मक परिस्थितीत वेगळे लढलो, तरी एकमेकांवर टीका करणार नाही; तसेच निवडणूक झाल्यानंतर आम्ही एकत्र येऊच,' असे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी नुकतेच स्पष्ट केले आहे. मुख्यमंत्र्यांच्या या भूमिकेची 'री' उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे आणि अजित पवार यांनीही ओढली असून, आगामी निवडणुका या महायुती एकत्र लढेल, असे जाहीररीत्या सांगितले आहे. प्रमुख महापालिकांमध्ये जागा वाटप कसे असेल, यावरही खलबते झडली असल्याचा स्थानिक नेत्यांचा दावा असून, पुणे महापालिकेतील जागावाटपात भाजपला सर्वाधिक जागा मिळणार असल्याचेही या नेत्यांचे म्हणणे आहे.

पुणे महापालिकेच्या २०१७च्या निवडणुकीत ११ गावांच्या समावेशानंतर १६४ जागांवर निवडणूक झाली. आगामी महापालिका निवडणुकीत २३ गावांचा समावेश झाल्याने आणखी तीन जागांची वाढ होण्याची शक्यता आहे.

असे असले तरी गत १६४ जागांनुसार जागावाटप करण्यात आले असून, त्यामध्ये भाजपला १६४, राष्ट्रवादी काँग्रेसला ४२, शिवसेनेला सात आणि 'आरपीआय'ला पाच जागा देण्याबाबत वरिष्ठ नेत्यांमध्ये एकमत झाल्याचा स्थानिक नेत्यांचा दावा आहे.

### शिवसेना, 'आरपीआय' ऐकणार का ?

भाजपने गत निवडणुकीत १६४ जागा लढविल्या होत्या. यंदा महायुतीमध्ये ११० जागांवर समाधान मानावे लागले, तर त्याची मोठी प्रतिक्रिया भाजपमध्येच उमटेल, अशी राजकीय वर्तुळात चर्चा आहे. भाजपच्या बालेकिल्ल्यात राष्ट्रवादी आणि शिवसेनेला जागा सोडाव्या लागल्या, तर त्याचाही फटका भाजपला बसेल, अशी भीती व्यक्त करण्यात येत आहे. याशिवाय गत निवडणुकीत भाजपने १६४ जागा लढवून ९८ जागा जिंकल्या होत्या. भाजपची महापालिकेत एकहाती सत्ता होती. तर, 'राष्ट्रवादी'चे ४० नगरसेवक होते. शिवसेनेचे १० नगरसेवक निवडून आले असले तरी सध्याच्या शिंदे सेनेमध्ये त्यापैकी केवळ एकच नगरसेवक राहिले आहेत. त्यामुळे शिंदे यांची शिवसेना ही केवळ सात जागांवर समाधान मानणारी नाही. भाजप स्वतंत्र लढला तेव्हा 'आरपीआय'ला दहा जागा देण्यात आल्या होत्या.

## फडणवीसांच्या मंत्रिमंडळात नाराजी

मुंबई: कॅबिनेट मंत्री राज्यमंत्र्यांना अधिकारच देत नसल्यानं मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या मंत्रिमंडळातील राज्यमंत्र्यांमध्ये मोठी नाराजी आहे. आपल्या खात्यात काय चाललंय, याची कल्पनाच राज्यमंत्र्यांना नाही. कॅबिनेट मंत्र्यांनी खात्याचा कार्यभार आपल्याकडेच ठेवलेला असल्यानं राज्यमंत्री केवळ नावापुरते आहेत, अशी परिस्थिती आहे. आपल्याकडे देण्यात आलेल्या विभागाच्या धोरणात्मक बाबी, मंत्रिमंडळात निर्णयासाठी देण्यात येणारे प्रस्ताव, अर्थ विभागाला सादर केले जाणारे प्रस्ताव, विधि आणि न्याय विभागाला सादर होणारे प्रस्ताव, विभागाकडे प्रलंबित न्यायालयीन प्रकरणं राज्यमंत्र्यांकडून कॅबिनेट मंत्र्यांकडे जाणं अपेक्षित असतं. पण सध्या असं होताना दिसत नाही. बहुतांश कॅबिनेट मंत्र्यांनी त्यांच्या खात्याच्या राज्यमंत्र्यांना पुरेसे अधिकारच दिलेले नाहीत. त्यामुळे सध्या बरीचशी प्रकरणं थेट कॅबिनेट मंत्र्यांकडे जात असल्यानं राज्यमंत्र्यांना त्यांच्या खात्यात सुरु असलेल्या कारभाराची कल्पनाच नाही. राज्याच्या मंत्रिमंडळात सहा राज्यमंत्री आहेत. सहाही जण पहिल्यांदाच मंत्री झालेले आहेत. पण गेल्या सहा महिन्यांत त्यांना फारशी चमक दाखवता आलेली नाही. अधिकारच नसल्यानं कामं कसं करायचं, असा प्रश्न त्यांना पडला आहे. फक्त राजकीय सोय म्हणून आम्हाला मंत्री करण्यात आलेलं आहे का? अधिकारच नसतील, तर मंत्रिपद केवळ शोभेपुरतं देण्यात आलंय का? असे प्रश्न खासगीत विचारुन हे मंत्री त्यांची खदखद व्यक्त करतात.

# शस्त्र परवान्यांची फेरतपासणी!

## चुकीच्या पद्धतीने शस्त्र परवाने देण्याचे काही प्रकार

। पुणे । महाईन्यूज । प्रतिनिधी।

**बीड जिल्ह्याप्रमाणेच पुणे शहर आणि जिल्ह्यात कोणाकोणाला शस्त्र परवाने देण्यात आले आहेत, याची फेरतपासणी करण्याच्या सूचना पोलीस आयुक्त आणि पोलीस अधीक्षकांना देण्यात आल्या आहेत. चुकीच्या पद्धतीने परवाने दिल्याचे स्पष्ट झाल्यास ते तातडीने रद्द केले जातील,' असे राज्याचे उपमुख्यमंत्री, पालकमंत्री अजित पवार यांनी सांगितले.**




### आम्ही बहुमताने निवडून आलो

अशा पद्धतीने चुकीच्या पद्धतीने शस्त्र परवाने देण्याचे काही प्रकार घडले आहेत. त्यामुळे शहर आणि जिल्ह्यातील शस्त्र परवान्यांची फेरतपासणी करण्यात येईल,' असे पवार यांनी सांगितले.'लाडकी बहीण' योजनेसाठी अन्य विभागांचा निधी वळविण्याच्या चर्चेबाबत मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी स्पष्टीकरण दिले आहे. आम्ही बहुमताने निवडून आलो आहोत. महायुतीचे सरकार कोणत्याही घटकावर अन्याय करणार नाही. राज्याच्या यंदाच्या अर्थसंकल्पात सामाजिक न्याय आणि आदिवासी विकास विभागाच्या निधीत ३९ वरून ४१ टक्क्यांपर्यंत वाढ करण्यात आली आहे. मात्र, काही जण अनावश्यक आणि चुकीच्या पद्धतीने या निर्णयावर चर्चा करत आहेत.

जिल्हा परिषदेच्या आवारातील स्वराज्य स्थापनादिनानिमित्त आयोजित कार्यक्रमानंतर पवार यांनी पत्रकारांशी संवाद साधला.'वैष्णवी हगवणे आत्महत्या प्रकरणातील आरोपी नीलेश चव्हाण याला पोलिसांनी शस्त्र परवाना नाकारला होता. मात्र, तत्कालीन गृहराज्यमंत्री सतेज पाटील यांनी त्याला परवाना मंजूर करण्याचा आदेश दिला होता. तसा अधिकार त्यांना होता. मात्र, अशा पद्धतीने चुकीच्या पद्धतीने शस्त्र परवाने देण्याचे काही प्रकार घडले आहेत. त्यामुळे शहर आणि जिल्ह्यातील शस्त्र परवान्यांची फेरतपासणी करण्यात येईल,' असे पवार यांनी सांगितले.'लाडकी बहीण' योजनेसाठी अन्य विभागांचा निधी वळविण्याच्या चर्चेबाबत मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी स्पष्टीकरण दिले आहे. आम्ही बहुमताने निवडून आलो आहोत. महायुतीचे सरकार कोणत्याही घटकावर अन्याय करणार नाही. राज्याच्या यंदाच्या अर्थसंकल्पात सामाजिक न्याय आणि आदिवासी विकास विभागाच्या निधीत ३९ वरून ४१ टक्क्यांपर्यंत वाढ करण्यात आली आहे. मात्र, काही जण अनावश्यक आणि चुकीच्या पद्धतीने या निर्णयावर चर्चा करत आहेत,' अशा शब्दांत उपमुख्यमंत्री पवार यांनी सामाजिक न्यायमंत्री संजय शिरसाट यांच्यावर अप्रत्यक्ष टीका केली.राज्य मंत्रिमंडळाची दर आठवड्याला बैठक होते. त्यामुळे असे प्रश्न मंत्र्यांनी मंत्रिमंडळात उपस्थित करणे आवश्यक असते. अनावश्यक चर्चेमुळे गैरसमज होतात. मंत्रिमंडळात एकमताने सर्व निर्णय घेतले जातात,' असेही उपमुख्यमंत्री पवार म्हणाले.दोन्ही 'राष्ट्रवादी'चे स्वतंत्र वर्धापनदिन होणार आहेत. ज्येष्ठ नेते शरद पवार यांच्या पक्षालाही वर्धापनदिन साजरा करण्याचा अधिकार आहे,' असे उपमुख्यमंत्री पवार यांनी स्पष्ट केले'वैष्णवी हगवणे आत्महत्या प्रकरणातील आरोपी नीलेश चव्हाण याला पोलिसांनी शस्त्र परवाना नाकारला होता. मात्र, तत्कालीन गृहराज्यमंत्री सतेज पाटील यांनी त्याला परवाना मंजूर करण्याचा आदेश दिला होता. तसा अधिकार त्यांना होता.

---

# गुन्हेगारी प्रवृत्ती रोखण्याबाबत ठराव!

## राष्ट्रवादीचे प्रदेशाध्यक्ष सुनील तटकरे यांची माहिती

। पुणे । महाईन्यूज । प्रतिनिधी।

**'महायुतीत 'राष्ट्रवादी' सहभागी असली, तरी पक्ष म्हणून स्वतंत्र भूमिका आहे. ही भूमिका मांडणारा पक्षाचा जाहीरनामा; तसेच पक्षाचा कोणताही कार्यकर्ता हा विकृत मनोवृत्तीचा आणि गुन्हेगारी प्रवृत्तीचा असता कामा नये, यावर चर्चा करून याबाबतचा ठराव वर्धापनदिनाच्या कार्यक्रमात मांडला जाणार आहे.'**



### शक्तिप्रदर्शन करण्याची तयारी

राष्ट्रवादी काँग्रेस (अजित पवार) पक्षाचे प्रदेशाध्यक्ष सुनील तटकरे यांनी शुक्रवारी सांगितले. पक्षाचा २६ वा वर्धापनदिन बालेवाडी येथील शिवछत्रपती क्रीडा संकुलात येत्या १० जूनला होणार असून, त्यानिमित्ताने शक्तिप्रदर्शन करण्याची तयारी करण्यात आली आहे. तटकरे यांनी शुक्रवारी कार्यक्रमस्थळाची पाहणी करून नियोजनाची माहिती घेतली.

राष्ट्रवादी काँग्रेस (अजित पवार) पक्षाचे प्रदेशाध्यक्ष सुनील तटकरे यांनी शुक्रवारी सांगितले. पक्षाचा २६ वा वर्धापनदिन बालेवाडी येथील शिवछत्रपती क्रीडा संकुलात येत्या १० जूनला होणार असून, त्यानिमित्ताने शक्तिप्रदर्शन करण्याची तयारी करण्यात आली आहे. तटकरे यांनी शुक्रवारी कार्यक्रमस्थळाची पाहणी करून नियोजनाची माहिती घेतली. त्यानंतर झालेल्या पत्रकार परिषदेत त्यांनी वर्धापनदिनाच्या सोहळ्याबाबत माहिती दिली. 'पक्षाचा कोणताही कार्यकर्ता विकृत मनोवृत्तीचा आणि गुन्हेगारी प्रवृत्तीचा असता कामा नये, अशी राष्ट्रवादी (अजित पवार) पक्षाची स्पष्ट भूमिका आहे. वैष्णवी हगवणे आत्महत्या प्रकरणातील आरोपी पक्षाचे पदाधिकारी असल्याचे स्पष्ट झाल्यानंतर त्यांची तातडीने हकालपट्टी करून कडक कारवाई करण्याच्या सूचना पोलिसांना देण्यात आल्या. पक्षाच्या वर्धापनदिनाच्या कार्यक्रमात गुन्हेगारी प्रवृत्ती रोखण्यावर चर्चा करून ठरावदेखील मांडला जाणार आहे,' असे तटकरे यांनी सांगितले.'महायुतीत सहभागी असला, तरी पक्ष म्हणून 'राष्ट्रवादी'ची स्वतंत्र भूमिका आहे. ही भूमिका तसेच पक्षाचा जाहीरनामा वर्धापनदिनाच्या कार्यक्रमात मांडला जाणार आहे. कोणत्या उपक्रमांवर भर देण्याची गरज आहे, यावर चर्चा करून त्याचे सविस्तर नियोजन केले जाणार आहे. पक्षाचे काम करणारा राज्यातील स्थानिक कार्यकर्ता यासाठी उपस्थित राहावा, म्हणून समन्वयक नेमून त्यांच्याकडे जबाबदारी देण्यात आली आहे,' असे तटकरे यांनी स्पष्ट केले.'लोकसभा, विधानसभा निवडणुकीच्या यशानंतर पक्षामध्ये उत्साहाचे वातावरण आहे. विधानसभा निवडणुकीच्या यशानंतरचा हा पहिलाच वर्धापनदिन असल्याने यंदा सोहळा भव्यदिव्य करण्याचे नियोजन आहे. यासाठी राज्यातून पक्षाचे महत्त्वाचे पदाधिकारी, लोकप्रतिनिधी उपस्थित राहणार आहेत. त्यामध्ये पक्षाचे नेते प्रफुल्ल पटेल, मंत्री छगन भुजबळ, धनंजय मुंडे यांच्यासह इतरांचा समावेश आहे. या कार्यक्रमासाठी २० हजार पदाधिकारी, कार्यकर्ते उपस्थित राहणारशहराध्यक्ष सुभाष जगताप, पिंपरी-चिंचवडचे शहराध्यक्ष योगेश बहल, माजी महापौर राजलक्ष्मी भोसले, शहर कार्याध्यक्ष प्रदीप देशमुख, महिला आघाडी प्रदेशाध्यक्षा व राज्य महिला आयोगाच्या अध्यक्षा रूपाली चाकणकर, शिवाजी गर्जे, सुरेश घुले आदी उपस्थित होते.

## महापालिका आयुक्त शेखर सिंह यांचे आश्वासन

# मोशीत कत्तलखाना नव्हे, गोशाळा होणार!

## भाजपा आमदार महेश लांडगे यांची प्रशासनाला सूचना

। पिंपरी-चिंचवड ।
महाईन्यूज । प्रतिनिधी।

**पिंपरी-चिंचवड महानगरपालिकेच्या नवीन विकास आराखड्यामध्ये मोशी येथे कत्तलखाना प्रस्तावित केला होता. या आरक्षणास स्थानिक नागरिक, भूमिपुत्र आणि सकल हिंदू समाजाचा तीव्र विरोध आहे. त्यामुळे सदर आरक्षण बदल करून, त्याच ठिकाणी गोशाळा उभारण्यासाठी भाजपा आमदार महेश लांडगे यांनी आग्रही भूमिका घेतली आहे.**



पिंपरी-चिंचवड महानगरपालिका प्रशासनाने नवीन प्रारुप विकास आराखडा प्रसिद्ध केला आहे. त्यावर सर्वसामान्य नागरिक, भूमिपुत्र, लोकप्रतिनिधी यांच्या हरकती-सूचना मागवण्यात आल्या आहेत. प्रशासनाने मौजे मोशी येथील नवीन गट नं. 325 (जुना गट नं. 323) या गावच्या हद्दीत कत्तलखान्यासाठी जागा आरक्षीत केली आहे. याला स्थानिक नागरिक, हिंदूत्ववादी संघटना आणि भाजपा आमदार महेश लांडगे यांनी विरोध केला.

दरम्यान, मोशी ग्रामस्थांच्या शिष्टमंडळाने आज महापालिका आयुक्त तथा प्रशासक शेखर सिंह यांची भेट घेतली. मोशी हे ऐतिहासिक, सामाजिक व सांस्कृतिक दृष्टीकोनातून महत्त्वाचे गाव असून, येथे अनेक धर्म, जाती आणि पंथाचे लोक शांततेने वास्तव्य करतात. अशा गावात कत्तलखाना सुरू केल्यास सामाजिक सलोखा बिघडण्याची शक्यता आहे. हा हिंदू धर्मियांच्या भावना दुखावणारा निर्णय आहे.

तसेच, सार्वजनिक पर्यावरण, नागरी आरोग्य आणि सामाजिक सलोखा राखण्यासाठी प्रशासनाने सदर कत्तलखान्याचे आरक्षण रद्द करावे आणि त्या ठिकाणी गोशाळा सुरू करावी. कारण, याच परिसरात मोशीचे ग्रामदैवत आणि जागृत देवस्थान श्री. नागेश्वर महाराज यांचे समाधीस्थळ आहे. या ठिकाणी लाखो भाविकांच्या उपस्थितीमध्ये भंडारा उत्सव साजरा केला जातो. तसेच, श्रीक्षेत्र आळंदी आणि श्रीक्षेत्र देहू यांच्यामध्ये मोशी गाव असून, वारकरी सांप्रदाय या भागात मोठ्या प्रमाणात आहे. त्यामुळे सदर आरक्षण रद्द करावे, अन्यथा मोशी ग्रामस्थांच्या वतीने तीव्र आंदोलन करण्यात येईल, असा इशारा देण्यात आला होता. यावर महापालिका आयुक्त शेखर सिंह यांनी ग्रामस्थांची भूमिका समजून घेतली.

आमदार महेश लांडगे यांनी याबाबत मागणी केली आहे. त्यानुसार, सदर कत्तलखाना आरक्षण रद्द करण्यात येईल आणि त्या ठिकाणी गोशाळा आरक्षण निश्चित करण्याबाबत संबंधित कमिटीसमोर प्रस्ताव ठेवण्यात येईल, असे आश्वासन दिले आहे. आमदार महेश लांडगे म्हणाले की, पिंपरी-चिंचवड शहराच्या प्रारुप विकास आराखड्यामध्ये (डीपी) दर्शविलेल्या मोशी-डुडुळगाव दरम्यानच्या कत्तलखान्यासंदर्भात मोशी येथील ग्रामस्थांनी आज आयुक्त शेखर सिंह यांची भेट घेतली. आळंदी देवस्थान पदाधिकाऱ्यांसह मोशी ग्रामस्थांचाही कत्तलखान्याला विरोध केला आहे.

डीपीची आखणी करणाऱ्या समितीने कत्तलखान्यासाठी वेगळी जागा निश्चित करायला हवी होती. डीपी नियोजन समितीसमोर तसा प्रस्ताव ठेवणार आहे. कत्तलखान्याची जागा बदलण्यात येईल, असे आश्वासन आयुक्त शेखर सिंह यांनी दिले आहे.

> “पिंपरी-चिंचवड महानगरपालिका प्रशासनाने सुधारित विकास आराखडा प्रसिद्ध केला आहे. ग्रामस्थ, स्थानिक नागरिक, भूमिपुत्र आणि शेतकऱ्यांच्या हरकती-सूचना घेतल्या जात आहेत. त्यावर सुनावणीही होणार आहे. सदर डीपी प्लॅन हा अद्याप अंतिम झालेला नाही. मोशी येथे कत्तलखाना कदापि होवू देणार नाही. त्याच ठिकाणी गोशाळा सुरू केली जाईल. याबाबत प्रशासनाकडे भूमिका मांडली आहे. भूमिपुत्र, शेतकरी, वारकरी सांप्रदाय आणि तमाम हिंदू बांधवांच्या मागणीप्रमाणे गोशाळा करण्यासाठी पाठपुरावा सुरू ठेवणार आहोत.
>
> **-महेश लांडगे,** आमदार, भाजपा, पिंपरी-चिंचवड, पुणे.

---

## चव बदलली तरी पाणी पिण्यायोग्यच!

## प्रक्रिया करूनच नागरिकांना पाण्याचे वितरण!; पाणी पुरवठा विभागाची माहिती

। पिंपरी-चिंचवड ।
महाईन्यूज । प्रतिनिधी।

**पावसाळ्याच्या सुरुवातीला नदीच्या पाण्यात गाळ, झाडपाला, सांडपाण्यासह इतर कचरा वाहून येतो. त्यामुळे हे पाणी काही प्रमाणात गढूळ असते. मात्र महापालिकेच्या वतीने जलशुद्धीकरण केंद्रांमध्ये जागतिक आरोग्य संघटना व केंद्रीय सार्वजनिक आरोग्य आणि पर्यावरण अभियांत्रिकी संघटनेच्या नियमांप्रमाणे शुद्धीकरणाची प्रक्रिया करण्यात येते. ही प्रक्रिया पूर्ण झाल्यानंतरच पाणी नागरिकांना वितरित केले जाते..**




पाण्याची चव व वास बदललेला जाणवत असला तरी ते पाणी पूर्णतः पिण्यायोग्य आहे, अशी माहिती महापालिकेच्या पाणी पुरवठा विभागाने दिली आहे. तसेच पावसाळ्यात पाणी उकळून प्यावे, असे आवाहनही करण्यात आले आहे.


पिंपरी-चिंचवड शहराला मावळमधील पवना व आंद्रा धरणातून पाणी पुरवठा केला जातो. मात्र पावसाळ्यातील चार महिने धरणातील साठा न वापरता नदीतील पाण्याचा वापर होतो. या कालावधीत नदीच्या पाण्यात गाळ, झाडपाला, व सांडपाण्यासारखा कचरा वाहून येतो. यामुळे पाणी गढूळ होते व टीडीएस म्हणजे एकूण विरघळलेल्या घन पदार्थांचे प्रमाण वाढते. याचा परिणाम पाण्याच्या चव व वासावर किंचित प्रमाणात होतो. महापालिका रावेत बंधाऱ्यावरून अशुद्ध पाणी उचलते, जे प्राधिकरण व निगडी येथील जलशुद्धीकरण केंद्रात पाठवले जाते. तसेच आंद्रा धरणातील पाणी इंद्रायणी नदीवरील निघोजे बंधाऱ्यावरून उचलून चिखली येथील जलशुद्धीकरण केंद्रात आणले जाते. येथे आधुनिक तंत्रज्ञानाद्वारे सर्व आवश्यक प्रक्रिया पार पाडली जाते. नंतर हे पाणी विविध टाक्यांमध्ये साठवले जाते आणि त्यामधून नागरिकांना वितरण केले जाते.

### पाणी पुरवठा विभागाचे उपाय

- महापालिकेच्या वतीने नागरिकांना योग्य प्रक्रिया केलेले व स्वच्छ पाणी देण्यात येते.
- जलशुद्धीकरण केंद्रात जागतिक आरोग्य संघटना व केंद्रीय सार्वजनिक आरोग्य आणि पर्यावरण अभियांत्रिकी संघटनेच्या मानकानुसार प्रक्रिया
- पाईपलाइन व टाक्यांचे नियमित स्वच्छीकरण
- गढूळ पाण्याच्या तक्रारींची तत्काळ दखल व उपाय
- दररोज पाण्याच्या गुणवत्तेची तपासणी
- किंचित चव बदलली असली तरी पाणी पिण्यायोग्यच

> “शहरवासीयांना स्वच्छ आणि शुद्ध पाणी मिळावे, यासाठी महापालिकेचा पाणी पुरवठा विभाग कटिबद्ध आहे. पाण्यावर शुद्धीकरणाची प्रक्रिया जागतिक आरोग्य संघटना व केंद्रीय सार्वजनिक आरोग्य आणि पर्यावरण अभियांत्रिकी संघटनेच्या मार्गदर्शक तत्त्वांनुसार केली जात आहे. ज्या भागात गढूळ पाणी येत आहे, तेथील नागरिकांनी स्थानिक पाणीपुरवठा कार्यालय किंवा नियंत्रण कक्षाशी संपर्क साधावा, तक्रारींवर तत्काळ कार्यवाही केली जाईल.
>
> **-प्रदीप जांभळे पाटील,**
> अतिरिक्त आयुक्त (१), पिंपरी चिंचवड महानगरपालिका

## श्रीब्रह्मचैतन्य गोंदवलेकर महाराजांची प्रवचने



### भगवंत आणि मी वेगळे नाहीत

समुद्राचा फेस खरा आहे असे वाटले, तरी त्याच्याखाली पाणीच असते. असत्य हे नेहमी सत्याला धरूनच राहते. जे नाही ते तोंडाने सांगणे ही माया. तिला आपण खरे मानतो. मायेला असत्य मानले की ब्रह्माला सत्यत्व येते. आपण मायेच्या पाठीमागे जातो, पण माया ही मृगजळाप्रमाणे आहे असे समजते तेव्हा आपण स्वस्थ होतो. जन्माच्या वेळेस ‘ सोऽहं ’ म्हणत होता, नंतर ‘ कोऽहं ’ म्हणू लागला आणि शेवटी ‘ देहच मी ’ म्हणू लागला ! वास्तविक, सूर्य आणि त्याचे किरण हे जसे वेगळे नाहीत, त्याप्रमाणे ‘ भगवंत ’ आणि ‘ मी ’ वेगळे नाहीत.सत्य म्हणजे अखंड टिकणारे ते, म्हणजे परमात्मस्वरूप होय. सच्चिदानंदस्वरूपाच्या ठिकाणी मन चिकटून राहणे यालाच अनुसंधान असे म्हणतात. भगवंतावाचून इतर सर्व म्हणजेच उपाधी होय. ‘ मला कळत नाही ’ असे वाटणे, ही परमार्थाची पहिली पायरी आहे; आणि मी आणि भगवंत वेगळे नाहीत असे अंगी मुरणे ही शेवटची पायरी होय. ‘ जे जे घडते त्याचा कर्ता परमात्मा आहे, मी फक्त कर्तव्यापुरता आहे ’ असे वाटणे, यालाच निष्काम कर्म असे म्हणतात; आणि ‘ आले तर भोगले, गेले तर सोडले ’ हे सहजकर्म होय; दोष बाधू नयेत अशा रीतीने केलेले कर्म ते ज्ञानयुक्त कर्म होय; आणि ईश्वराच्या स्मरणात केलेले कर्म त्याला निरासक्त कर्म असे म्हणतात. ‘ अमुकच फळ मला मिळावे ’ ही वृत्ती सोडणे, याचे नाव निरासक्ती होय. विषयांची विरक्ती झाली की त्याला ज्ञान झाले असे म्हणतात. थोडक्यात म्हणजे जे कर्म बंधनाला कारण होते ते अज्ञान आणि जे मोक्षाला कारण होते ते ज्ञान समजावे. कर्ममार्ग, उपासनामार्ग, नवविधाभक्ती इ. सर्वांनी गाठण्याचे ध्येय एकच असते. लग्नात ज्याप्रमाणे अमुक एक खर्च मी जास्त करीन, दुसरा कमी करीन असे माणूस म्हणतो, पण मुख्य कार्य हे, की मुलीला नवरा गाठून देणे; त्याप्रमाणे भगवंताची भेट होणे हे मुख्य होय. आपली देहबुद्धी संतांच्या संगतीच्या आड येऊ देऊ नये. भगवंताच्या, स्वरूपदर्शनाच्या आड माझ्या देहबुद्धीचा पर्वत येतो. सर्व साधनांचा उपयोग अभिमान नाहीसा करण्यासाठी असतो. नामस्मरणाने हे काम लवकर होते आणि म्हणूनच सर्व साधनांचे सार भगवंताचे नाम हेच आहे. ते आपण श्रद्धापूर्वक घ्यावे आणि भगवंताशी एकरूप व्हावे. आपण प्रयत्न करीत असताना, भगवंत माझ्या पाठीशी आहे ही भावनाच आपल्याला उद्धरून नेईल याची खात्री बाळगा.

**बोधवचन:- आज तुम्हाला जेवढा वेळ रिकामा मिळतो, तेवढा सगळा भगवंताच्या नामात घालवण्याचा प्रयत्न करा.**

# राजकारणातील गुंतागुंतीची समीकरणे, चर्चा फक्त ब्रँडची !



‘स्टेट’मेंट
अधिकराव दिवे-पाटील
संस्थापक, संपादक

**उद्धव ठाकरे यांच्या नेतृत्वाखालील उबाठा गट आणि राज ठाकरे यांची महाराष्ट्र नवनिर्माण सेना एकत्र येणार या चर्चांना आता अंतिम स्वरूप येऊ लागले आहे. कदाचित, येत्या दोन दिवसात तो निर्णय होईल. त्याचप्रमाणे, राष्ट्रवादी काँग्रेस मधील अजित पवार गट आणि शरद पवार गट हे देखील एकत्र येणार, अशा हालचाली सुरू आहेत. प्रत्यक्षात, ठाकरे ब्रँडचे मनोमीलन हे सत्ताधाऱ्यांच्या विरोधात आहे, तर पवार ब्रँडचे एकत्र येणे, हे सत्ताधाऱ्यांच्या बाजूचे आहे. एकूणच राजकारणातील समीकरणे प्रचंड गुंतागुंतीची झाली असून ठाकरे आणि पवार ब्रँड राजकारणात कितपत चालतील, यावरच पुढील बेरीज, वजाबाकी मांडली जाणार आहे.**



### काँग्रेससाठी दोन्हीही अडचणीचे

महाराष्ट्र समोर अनेक प्रश्न असून त्याकडे कोणी पाहत नाही असे म्हणणारे उद्धव ठाकरे आता मनोमीलनाची चर्चा ही त्यापेक्षा मोठी असल्याचे मानत आहेत. आता स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका समोर दिसत असल्याने ठाकरे ब्रँड एकत्र येणे जसे महत्वाचे वाटते, तसेच पवार ब्रँडलाही महत्त्व देणे आवश्यक आहे.

### राज ठाकरे - काँग्रेस जमणार का?

महाविकास आघाडीमध्ये उद्धव ठाकरे आणि काँग्रेस यांनी एकमेकांशी चांगले जमवून घेतले. काँग्रेसच्या प्रदेशाध्यक्षांनी नुकतीच ‘मातोश्री’लाही भेट देऊन मुंबई महानगरपालिकेत आघाडी एकत्र ठेवण्याचे आश्वासन दिले. पण, आता उद्धव यांचे राज यांच्याशी हस्तांदोलन झाले, तर काँग्रेस पुढे मोठा प्रश्न येणार आहे. कारण, उद्धव यांनी काँग्रेसला सोडावे, अशी पहिली अट राज ठाकरे भागतील यात शंका नाही. मग, आघाडीमध्ये उद्धवही नाही आणि राष्ट्रवादीही नाही, असे विचित्र वातावरण निर्माण होईल.

### काँग्रेसलाही हेच हवे?

ठाकरे बंधूंबरोबर आघाडी करण्यात काँग्रेसला मुळीच रस नाही असे एकूण चित्र आहे. काँग्रेसच्या डोळ्यासमोर मुंबई महानगरपालिकेपेक्षा बिहारची निवडणूक महत्त्वाची आहे. बिहारच्या निवडणुकीत मुंबईत शिवसेना-मनसेसोबत गेल्याचे काय पडसाद उमटतात? त्याचे इतर पक्ष काय भांडवल करतात, याचाही विचार काँग्रेस करीत असेल. बिहारमध्ये काँग्रेस राष्ट्रीय जनता दलासोबत युती करणार. पण, त्याचवेळी मुंबईत ठाकरे बंधूनसोबत राहिल्यास लालूप्रसाद यादव आणि त्यांचे चिरंजीव तेजस्वी यांना बहुदा ते आवडणार नाही.

### मुंबईत काँग्रेसची अवस्था काय?

दुसरीकडे, मुंबई काँग्रेसमध्ये तर ‘ ‘घरचे झाले थोडे, अन् व्याह्याने धाडले घोडे’ अशी काँग्रेसची अवस्था झाली आहे. मुंबई काँग्रेसमध्ये प्रचंड दुबळी असून अनेक नेत्यांची तोंडे अनेक दिशांना आहेत. त्यात मुंबईमध्ये भाजपा, शिवसेना, ठाकरे बंधू यांची ताकद पणाला लागणार असल्यामुळे तेथे काँग्रेसला थाराच असणार नाही.. दिसणारही नाही !

### ही तर महाराष्ट्राची इच्छा..

ठाकरे बंधूंनी एकत्र यावे, अशी अनेक शिवसैनिकांची आणि महाराष्ट्राची इच्छा दिसते. राजकारणात आता तत्त्वापेक्षा व्यवहाराला महत्त्व आले आहे. ठाकरेंच्या सैनिकांना आपल्याला सत्ता कधी मिळेल, याची चिंता सतावू लागली आहे. आताच्या राजकारणात केवळ तात्त्विकतेवर पोट भरत नाही. त्यासाठी दोन्ही ठाकरे एकत्र आले तर जिवंत राहू, अन्यथा आहोत, तिथेच संपून जावे लागेल, असा विचार दोन्ही सेनेच्या सैनिकांमध्ये येत असेल तो चुकीचा आहे, असे म्हणता येत नाही. उद्धव ठाकरे यांच्या मते महाराष्ट्राच्या मनात आहे तेच होईल. पण, २०१९ मध्ये याच महाराष्ट्राने मनामधील शिवसेना-भाजपा युतीला कौल दिला होता, तेव्हा महाराष्ट्राच्या मनात काय, हा मुद्दा उद्धव ठाकरे यांनी लाथाडून काँग्रेसच्या मांडीवर बसून सत्ता उपभोगली होती. अर्थात, हे महाराष्ट्र विसरला नाही. उद्धव ठाकरे नाही त्याची शिक्षा मिळाली आहे.

### ठाकरे बंधू आग्रही आणि हेकट..

केवळ दोन ठाकरे एकत्र येऊन प्रश्न सुटत नाही. दोन पक्ष शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे आणि महाराष्ट्र नवनिर्माण सेना यांची ही युती असेल. ती करताना दोन्ही पक्षांचे अस्तित्व कायम ठेवून ती होईल. जागावाटप हादेखील कळीचा मुद्दा असेल. याही पेक्षा काय महत्त्वाचे असेल तर दोन्ही पक्षांच्या विविध विषयांवरील भूमिका एकामेकांना मान्य व्हायला हव्यात आणि सत्ता मिळाली, तर निर्णयप्रक्रियेत दोघांनाही तुल्यबळ स्थान हवे असणारच! सन २०१७ मध्ये शिवसेनेने चुरशीच्या लढतीत भाजपाला बाजूला ठेवून सत्ता मिळवली खरी. पण मनसेचे नगरसेवक फोडल्यामुळे काहीशी कटुता निर्माण झाली होती. दोन्ही ठाकरे बंधू यांचा स्वभाव अतिशय आक्रमक आग्रही आणि हे कट असल्यामुळे प्रसंगी संयम बाळगून माघार घेण्याची भूमिका कोण घेणार हा मुद्दा महत्त्वाचा ठरतो !

### ‘महायुती’ च्या मनात काय?

दोन ठाकरे एकत्र येऊ नये, अशीच ‘महायुती’ ची इच्छा असणार यात शंका नाही. एकनाथ शिंदे यांचे काही विश्वासू नेते शिवतीर्थवर जात आहेत ते यासाठीच ! दोन ठाकरे एकत्र आल्यानंतर मुंबईतली ठाकरे व्होटबँक स्वतंत्र अस्तित्व दाखवणारच. तिथे शिंदेंच्या सेनेची डाळ शिजणार का याची काळजी शिंदेंना आहे.दुसरीकडे राजकीय तत्त्वज्ञानापेक्षा आपले समर्थक सोबत राहिले, ते निवडून आले तर आपले राजकारण टिकेल, या हिशेबाने शरद पवारांनी उक्ती आणि कृती यात चाणाक्षपणे अंतर राखत राजकारण केले. त्यांच्या राजकारणात भावनिकतेला स्थान नाही. शिवसेना आणि राष्ट्रवादी यांच्यात फरक आहे हे हाच! पण, शरद पवार आणि अजित पवार एकत्र येणार अशा बातम्या सुरू झाल्या की शिवसेनेचे काही नेते बेफाम प्रतिक्रिया देऊन मोकळे होतात. आता, कन्या सुप्रिया सुळे व इतर सहकाऱ्यांना राजकारणात टिकून राहण्यासाठी जे जे करता येईल, ते शरद पवार करत असतात. म्हणूनच त्यांनी आपण पक्षाच्या राजकीय निर्णयप्रक्रियेत नसल्याची सूचक विधाने केली आहेत, हे लक्षात घ्यायला हवे.

### पुढील राजकारण आव्हानात्मक..

उबाठा सेनेत विचारप्रक्रिया, राजकीय व्यूहरचना यापेक्षा ‘आवाज कुणाचा’ यावरच भर असतो. या घोषणेला प्रतिसाद देणाऱ्यांची संख्या दिवसेंदिवस घटत असताना, रोज एकेकजण एकनाथ शिंदेंच्या सेनेत जात असताना काही वेगळा विचार झाला तर ठीक. अन्यथा, पुढचा काळ दोन्ही ठाकरे, पवार गट अन् काँग्रेससाठीही आणखीच आव्हानात्मक असणार आहे, असेच एकूण राजकारण चालले आहे, हे मात्र विचार करायला लावणारे आहे!

**महाईन्यूज** हे डिजिटल वृत्तपत्र **संस्थापक-संपादक श्री. अधिकराव दिवे- पाटील** यांनी छत्रपती शिवाजी महाराज गोल मंडई, गाळा क्र. ७९/८०, संत तुकारामनगर, पिंपरी, पुणे- 411018 येथे पुणे विभागीय कार्यालयामधून प्रसिद्ध केले आहे. एमएसएमई नोंदणी क्रमांक : MH-26-0158827. या वृत्तपत्रात डिजिटल स्वरुपात मुद्रीत केलेले लेख, बातम्या तसेच लेखनाशी किंवा विचारांशी संस्थापक-संपादक सहमत असतीलच असे नाही.
**कार्यकारी संपादक : वैष्णव जाधव । मुख्य कार्यकारी संपादक : सुनील आढाव.** (*सर्व बातम्यांची, लेखांची व लेखनाची जबाबदारी यांची राहील) विशेष सूचना: हा अंक कोणत्याची प्रकारच्या प्रिंटसाठी नाही. गैरवापर केल्यास कायदेशीर कारवाई केली जाईल.

# चार कोटींचे पीकहानी अनुदान वसूल!

## जालना जिल्ह्यातील अनुदान वितरणाची चौकशी

। मुंबई ।
प्रतिनिधी : महाईन्यूज ।

**अतिवृष्टी , गारपीट इत्यादींमुळे पिकांच्या नुकसानीबद्दल जिल्ह्यातील अंबड आणि घनसावंगी तालुक्यांत वितरित रकमेपैकी ४० कोटी रुपयांची चौकशी आतापर्यन्त पूर्ण झाली आहे. यापैकी १८ कोटी रुपयांचा हिशोब लागलेला नाही. चुकीच्या पध्दतीने वितरित पीकहानी अनुदानापैकी जवळपास चार कोटी रुपये शासकीय पातळीवर वसूल झालेले आहेत.**



२०२२-२०२३ आणि २०२३-२०२४ या दोन वर्षात झालेल्या पीकहानीबद्दल अंबड तसेच धनसावंगी तालुक्यांत वितरित अनुदानापैकी ७५ कोटी रुपयांबाबत आक्षेप आहे. यापैकी २२ कोटी रुपयांचा तपशील चौकशी समोर सादर झाला असून १८ कोटींचा हिशोब मात्र लागत नाही. उर्वरित ३५ कोटींच्या अनुदानाचा चौकशी अहवाल तपासणी करणारांनी अद्याप सादर केलेला नाही. त्यामुळे या संदर्भातील २५ तलाठ्यांना अंतिम नोटीसा बजावण्याचा निर्णय जिल्हा प्रशासनाने घेतला आहे.जिल्हाधिकारी डॉ. श्रीकृष्ण पांचाळ यांनी सांगितले की पीकहानीसाठी वितरित झालेल्या अनुदानाची चौकशी संपूर्ण जिल्ह्यात करण्यात येणार आहे. अंबड आणि घनसावंगी या दोन तालुक्यांत गैरप्रकारे वितरित अनुदानापैकी साडेतीन ते चार कोटी रुपये आतापर्यन्त वसूल झाले आहेत. जिल्हाभर जस-जशी चौकशी होईल त्यानुसार गैरप्रकाराची आणि वसुलीची रक्कम आणखी समोर येईल. भाजपचे आमदार बबनराव लोणीकर यांनी पीकहानी अनुदान वितरणात सुमारे शंभर कोटींचा गैरप्रकार झाल्याचा अंदाज व्यक्त केला आहे. यासाठी स्थानिक पातळीवरील तलाठी, ग्राम सेवक आणि कृषी सहाय्यक यांनाच जबाबदार धरून चालणार नाही. तर त्यासाठी तालुका जिल्हा पातळीवरील छाणणी समित्यांचीही चौकशी करावी अशी मागणी लोणीकर यांनी केली आहे.शेती नसणाऱ्यांना पीक हानी अनुदान देणे, एकाच व्यक्तीस दोनदा अनुदान वितरित करणे, शासकीय जमीन स्वतःच्या नावावर दाखवणारांना अनुदान देणे इत्यादी मुद्यांच्या आधारे जिल्हाधिकारी यांनी स्थापन केलेली समिती याप्रकरणी चौकशी करीत आहे.२०२२-२०२३ आणि २०२३-२०२४ या दोन वर्षात झालेल्या पीकहानीबद्दल अंबड तसेच धनसावंगी तालुक्यांत वितरित अनुदानापैकी ७५ कोटी रुपयांबाबत आक्षेप आहे. यापैकी २२ कोटी रुपयांचा तपशील चौकशी समोर सादर झाला असून १८ कोटींचा हिशोब मात्र लागत नाही. उर्वरित ३५ कोटींच्या अनुदानाचा चौकशी अहवाल तपासणी करणारांनी अद्याप सादर केलेला नाही. त्यामुळे या संदर्भातील २५ तलाठ्यांना अंतिम नोटीसा बजावण्याचा निर्णय जिल्हा प्रशासनाने घेतला आहे.जिल्हाधिकारी डॉ. श्रीकृष्ण पांचाळ यांनी सांगितले की पीकहानीसाठी वितरित झालेल्या अनुदानाची चौकशी संपूर्ण जिल्ह्यात करण्यात येणार आहे. अंबड आणि घनसावंगी या दोन तालुक्यांत गैरप्रकारे वितरित अनुदानापैकी साडेतीन ते चार कोटी रुपये आतापर्यन्त वसूल झाले आहेत. जिल्हाभर जस-जशी चौकशी होईल.

### शंभर कोटींचा गैरप्रकार

भाजपचे आमदार बबनराव लोणीकर यांनी पीकहानी अनुदान वितरणात सुमारे शंभर कोटींचा गैरप्रकार झाल्याचा अंदाज व्यक्त केला आहे. यासाठी स्थानिक पातळीवरील तलाठी, ग्राम सेवक आणि कृषी सहाय्यक यांनाच जबाबदार धरून चालणार नाही. तर त्यासाठी तालुका जिल्हा पातळीवरील छाणणी समित्यांचीही चौकशी करावी अशी मागणी लोणीकर यांनी केली आहे.शेती नसणाऱ्यांना पीक हानी अनुदान देणे, एकाच व्यक्तीस दोनदा अनुदान वितरित करणे, शासकीय जमीन स्वतःच्या नावावर दाखवणारांना अनुदान देणे इत्यादी मुद्यांच्या आधारे जिल्हाधिकारी यांनी स्थापन केलेली समिती याप्रकरणी चौकशी करीत आहे.अतिवृष्टी , गारपीट इत्यादींमुळे पिकांच्या नुकसानीबद्दल जिल्ह्यातील अंबड आणि घनसावंगी तालुक्यांत वितरित रकमेपैकी ४० कोटी रुपयांची चौकशी आतापर्यन्त पूर्ण झाली आहे.

# काही वडिलांच्या नावावर फुशारक्या मारतात!

## एकनाथ शिंदे यांचा नामोल्लेख टाळून ठाकरे यांना टोला

। मुंबई ।
प्रतिनिधी : महाईन्यूज ।

**श्रीमंत कुटुंबात जन्माला येऊन देखील सिद्धाराम म्हेत्रे यांच्यात कधीही अहंभाव आणि श्रीमंतीचा दर्प आला नाही. त्यांचे पाय कायम जमिनीवर राहिले आहेत. परंतु, काही मंडळी स्वतःच्या कर्तृत्वापेक्षा वडिलांच्या नावावर नुसत्या फुशारक्या मारतात, अशा शब्दांत शिवसेनेचे प्रमुख नेते, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी शिवसेना उद्धव ठाकरे पक्षाचे प्रमुख उद्धव ठाकरे यांना त्यांचा नामोल्लेख टाळून टोला लगावला.**



अक्कलकोटमध्ये काँग्रेसचे नेते, माजी मंत्री सिद्धाराम म्हेत्रे यांनी उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या प्रमुख उपस्थितीत शिवसेनेत प्रवेश केला. त्यावेळी आयोजित मेळाव्यात ते बोलत होते. यावेळी शालेय शिक्षणमंत्री दादा भुसे, जलसंधारणमंत्री संजय राठोड यांच्यासह विधान परिषदेच्या उपसभापती डॉ. नीलम गोऱ्हे आदी उपस्थित होते. गुरुवारी दुपारी तीन वाजता म्हेत्रे यांचा शिवसेना पक्षप्रवेश सोहळा होणार होता. परंतु, नाशिक येथून उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांना येण्यास तब्बल सहा तास उशीर झाला.

रात्री नऊ वाजता त्यांचे आगमन झाले. ते म्हणाले, सिद्धाराम म्हेत्रे यांनी काँग्रेसचा हात सोडून शिवसेनेचा भगवा ध्वज हाती घेतला आहे. जेथे दिशा नाही, तेथे दशा झाली. येणाऱ्या काळात विरोधकांचा एकही तंबू शिल्लक राहणार नाही. म्हेत्रे हे अनुभवी नेते आहेत. त्यांच्या नावातच राम आहे. ते शिवसेनेत आल्यामुळे आता सोलापूरसह अक्कलकोट आणि दुधनी शहराचे भविष्य बदलल्याशिवाय राहणार नाही. म्हेत्रे यांच्या पाठीशी आपली ताकद कायम राहील. त्यांचा आपल्याकडून नेहमीच सन्मान राखला जाईल, अशी ग्वाही त्यांनी दिली.अक्कलकोटमध्ये आयोजित या पक्षप्रवेश मेळाव्यासाठी दुपारी दोनपासून हजारोंचा जनसमुदाय उपस्थित होता. उपमुख्यमंत्री शिंदे यांनी मेळाव्यात व्यासपीठावर आल्यानंतर उशीर झाला असतानाही वाट पाहात थांबल्याबद्दल लोटांगण घालत जनसमुदायाला अभिवादन केले.

### आपण पूर्वी शिवसैनिक होतो

यावेळी बोलताना म्हेत्रे यांनी आपण वैयक्तिक फायद्यासाठी नव्हे तर अक्कलकोट तालुक्यातील विकासाचे प्रश्न सोडविण्यासाठी शिवसेनेत आलो असून, कुरकूर धरणाचे आणि देगाव जोड कालव्याचे उर्वरीत काम पूर्ण करण्यासाठी सहाशे कोटींचा निधी उपलब्ध करून देण्याची मागणी केली. याच व्यासपीठावर शिवसेनेच्या अनिता माळगे यांनी आपल्या आक्रमक भाषणात, अक्कलकोटचे भाजपचे आमदार सचिन कल्याणशेट्टी यांच्यावर शाब्दिक हल्ला चढवत त्यांना थेट आव्हान दिले.माजी मंत्री म्हेत्रे यांच्या शिवसेना प्रवेश सोहळ्यात पक्षाच्या बहुसंख्य नेत्यांनी हजेरी लावली होती. उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या आगमनानिमित्त स्वागताची जाहिरातही दिली होती. आमदार खरे यांनी यापूर्वीही आपण राष्ट्रवादी शरद पवार पक्षाचे आमदार असलो तरी आपण पूर्वी शिवसैनिक होतो.

# एलॉन मस्कचं डोकं ठिकाणावर नाही!

## ट्रम्प आणि एलॉन मस्क यांच्यात शाब्दिक वाद

।नवी दिल्ली ।
प्रतिनिधी : महाईन्यूज ।

**अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प आणि जगातील सर्वात श्रीमंत व्यक्तींपैकी एक एलॉन मस्क यांच्यात दुरावा आला आहे. एलॉन मस्क हे ट्रम्प प्रशासनातून बाहेर पडल्यानंतर या दोघांमधील मतभेद आता जाहीर झाले आहेत. यादरम्यान आता अमेरिकेच्या राष्ट्राध्यक्षांनी मस्क याच्याबरोबर चर्चा करण्यासही अनुत्सुकता दाखवली आहे. ट्रम्प यांनी आपल्याला मस्क यांच्याशी बोलण्यात विशेष स्वारस्य नाही, असे एबीसी न्यूजशी बोलताना म्हटले आहे.**


(Image source: AP)

तुम्ही तो व्यक्ती म्हणताय का ज्याचे डोके ठिकाणावर नाही?" असे ट्रम्प यावेळी म्हणाले, तसेच मस्क यांना बोलायचे होते पण आपण त्या संवादासाठी तयार नव्हतो, असेही ट्रम्प पुढे बोलताना म्हणाले.दुसरीकडे मस्क यांनी समेटाबद्दल सूचक वक्तव्य केले होते, त्यांनी बिल ॲकमन (BILL ACKMAN) यांनी या दोघांना केलेल्या 'महान देशाच्या फायद्यासाठी शांतता स्थापन करा' या अवाहनाला प्रतिसाद देत एक्सवर पोस्ट केली होती. ज्यामध्ये मस्क "तुम्ही चुकीचे नाहीत," असे म्हणाले होते.डोनाल्ड ट्रम्प आणि एलॉन मस्क यांच्या गुरूवारी झालेल्या शाब्दिक वाद झाला. यानंतर दोघांमध्ये गोष्टी सुरळीत करण्याच्या उद्देशाने व्हाईट हाऊसने शुक्रवारी मस्क यांच्याशी फोनवरून संपर्क साधला जाणार आहे, असे वृत्त पॉलिटिकोने दिले. मात्र शुक्रवारी दोघांमध्ये समेट घडवून आणण्यासाठी अशा प्रकारचा कोणताही फोन कॉल करण्याचे नियोजन नसल्याचे अनेक रिपोर्ट्समधून सांगण्यात आले.डोनाल्ड ट्रम्प आणि इलॉन मस्क यांच्यातील वाद हा सोशल मीडियावर सुरू झाला. एलॉन मस्क यांनी 'टॅक्स अँड स्पेंडिंग बिल' यावर टीका केली, ज्यानंतर ट्रम्प यांनी व्हाईट हाऊस येथे इलॉन मस्क यांच्याबाबत आपण निराश असल्याचे म्हटले . यावर मस्क यांनी प्रत्युत्तर देत राष्ट्राध्यक्षांच्या व्यापार धोरणांमुळे आर्थिक मंदी येईल, असे म्हटले आणि याबरोबरच बाल लैंगिक गुन्ह्यात दोषी ठरवण्यात आलेल्या जेफ्री इपस्टाईन (JEFFREY EPSTEIN) यांच्याशी ट्रम्प यांच्या संबंधांबद्दल विधान केले.ट्रम्प यांनी अमेरिकेचे सरकारी कंत्राटे रद्द करण्याच्या धमकीला उत्तर देत मस्क यांनी नासा वापरत असलेले ड्रॅगन स्पेसक्राफ्ट रिटायर करतील अशी पोस्ट एक्सवर केली. पण काही वेळाने त्यांनी ही पोस्ट मागे घेतली आणि "चांगला सल्ला आहे. ओके. आम्ही ड्रॅगन डी-कमीशन करणार नाहीत," असे म्हटले. दरम्यान इलॉन मस्क यांनी ट्रम्प सरकारमधून बाहेर पडल्यानंतर ट्रम्प सरकारच्या नव्या टॅक्स अँड स्पेंडिंग विधेयकावर (TAX AND SPENDING BILL) जोरदार हल्लाबोल केला होता. तसेच याबाबत मस्क यांनी एक्स या मायक्रोब्लॉगिंग प्लॅटफॉर्मवर या विधेयकाचा 'घृणास्पद कृत्य' असा उल्लेख केला होता. तसेच या विधेयकामुळे खूप तोटा होईल असेही म्हटले होते. दरम्यान, ट्रम्प प्रशासनाने आणलेल्या नव्या कर विधेयकात इलेक्ट्रिक वाहनांना मिळणारी सूट रद्द करण्यात आल्यामुळे इलॉन मस्क हे नाराज असल्याचं बोललं जात आहे. तुम्ही तो व्यक्ती म्हणताय का ज्याचे डोके ठिकाणावर नाही?" असे ट्रम्प यावेळी म्हणाले, तसेच मस्क यांना बोलायचे होते पण आपण त्या संवादासाठी तयार नव्हतो, असेही ट्रम्प पुढे बोलताना म्हणाले.दुसरीकडे मस्क यांनी समेटाबद्दल सूचक वक्तव्य केले होते.

### फायद्यासाठी शांतता स्थापन करा

, त्यांनी बिल ॲकमन (BILL ACKMAN) यांनी या दोघांना केलेल्या 'महान देशाच्या फायद्यासाठी शांतता स्थापन करा' या अवाहनाला प्रतिसाद देत एक्सवर पोस्ट केली होती. ज्यामध्ये मस्क "तुम्ही चुकीचे नाहीत," असे म्हणाले होते.डोनाल्ड ट्रम्प आणि एलॉन मस्क यांच्या गुरूवारी झालेल्या शाब्दिक वाद झाला. यानंतर दोघांमध्ये गोष्टी सुरळीत करण्याच्या उद्देशाने व्हाईट हाऊसने शुक्रवारी मस्क यांच्याशी फोनवरून संपर्क साधला जाणार आहे, असे वृत्त पॉलिटिकोने दिले. मात्र शुक्रवारी दोघांमध्ये समेट घडवून आणण्यासाठी अशा प्रकारचा कोणताही फोन कॉल करण्याचे नियोजन नसल्याचे अनेक रिपोर्ट्समधून सांगण्यात आले.

# ऑपरेशन सिंदूर'बद्दल फेसबुकवर पोस्ट!

## गुजरातमध्ये काँग्रेस नेत्याला अटक; नेमकं काय आहे प्रकरण?

।नवी दिल्ली ।
प्रतिनिधी : महाईन्यूज ।

**गुजरात काँग्रेसचे सरचिटणीस राजेश सोनी यांना शुक्रवारी राज्याच्या सायबर सेलने अटक केली आहे. 'ऑपरेशन सिंदूर' बद्दल दिशाभूल करणारी आणि मानसिक खच्चीकरण करणारा मजकूर सोशल मीडियावर पोस्ट केल्याबद्दल ही कारवाई करण्यात आली आहे. पीटीआय या वृत्तसंस्थेने यासंबंधीचे वृत्त दिले आहे.**




पोलीसांनी सांगितले की , सोनी यांच्यावर फेसबुकवर आक्षेपार्ह वक्तव्य फेसबुकवर पोस्ट केल्याचा आरोप आहे. भारताने पहलगाम येथे झालेल्या दहशतवादी हल्ल्याला उत्तर देत पाकिस्तान आणि पाकिस्तान व्याप्त काश्मीरमधील दहशतवादी तळांना लक्ष्य करण्यासाठी ऑपरेशन सिंदूर राबवले होते.पोलिस अधीक्षक (सीआयडी-सायबर क्राइम) भारतसिंह टांक म्हणाले की सोनी यांच्या पोस्ट फक्त दिशाभूल करणाऱ्याच नाहीत राष्ट्रीय सुरक्षेसाठी देखील धोकादायक आहेत. "या मजकूराने लष्करी कर्मचाऱ्यांचे मनोबल खचले आणि देशाच्या सार्वभौमत्वाला धोका निर्माण झाला, असे टांक म्हणाले. सोनी यांच्याविरोधात भारतीय न्याय संहितेच्या (बीएनएस) कलम १५२ (देशाच्या एकता, अखंडता आणि सार्वभौमत्वाला धोका निर्माण करणे) आणि कलम ३५३ (१)(अ) (गैरप्रकारांना उत्तेजना देणारे विधान करणे) यांच्या आधारे गुन्हा दाखल करण्यात आला आहे.दरम्यान या प्रकरणी पुढील तपास सुरू आहे. काँग्रेस पक्षाने अद्याप सोनी यांच्या अटकेबाबत अधिकृत निवेदन जारी केलेले नाही.पोलीसांनी सांगितले की , सोनी यांच्यावर फेसबुकवर आक्षेपार्ह वक्तव्य फेसबुकवर पोस्ट केल्याचा आरोप आहे. भारताने पहलगाम येथे झालेल्या दहशतवादी हल्ल्याला उत्तर देत पाकिस्तान आणि पाकिस्तान व्याप्त काश्मीरमधील दहशतवादी तळांना लक्ष्य करण्यासाठी ऑपरेशन सिंदूर राबवले होते. टांक म्हणाले की सोनी यांच्या पोस्ट फक्त दिशाभूल करणाऱ्याच नाहीत राष्ट्रीय सुरक्षेसाठी देखील धोकादायक आहेत.

### गैरप्रकारांना उत्तेजना देणारे विधान

"या मजकूराने लष्करी कर्मचाऱ्यांचे मनोबल खचले आणि देशाच्या सार्वभौमत्वाला धोका निर्माण झाला, असे टांक म्हणाले. सोनी यांच्याविरोधात भारतीय न्याय संहितेच्या (बीएनएस) कलम १५२ (देशाच्या एकता, अखंडता आणि सार्वभौमत्वाला धोका निर्माण करणे) आणि कलम ३५३ (१)(अ) (गैरप्रकारांना उत्तेजना देणारे विधान करणे) यांच्या आधारे गुन्हा दाखल करण्यात आला आहे.दरम्यान या प्रकरणी पुढील तपास सुरू आहे. गुजरात काँग्रेसचे सरचिटणीस राजेश सोनी यांना शुक्रवारी राज्याच्या सायबर सेलने अटक केली आहे. 'ऑपरेशन सिंदूर' बद्दल दिशाभूल करणारी आणि मानसिक खच्चीकरण करणारा मजकूर सोशल मीडियावर पोस्ट केल्याबद्दल ही कारवाई करण्यात आली आहे.

# आई कुठे काय करते'फेम अभिनेत्री रमली शेतकामात

मराठी मनोरंजन विश्वातील अनेक कलाकार मंडळी ही त्यांच्या साधेपणसाठी ओळखली जातात. कलाकार किंवा सेलिब्रिटी असल्याचा आव न आणता अगदी सामान्य माणसाप्रमाणे हे कलाकार वागतात. कलाकारांचा हाच साधेपणा चाहत्यांना भावतो. अनेक कलाकार सोशल मीडियाद्वारे त्यांच्या दैनंदिन आयुष्यातील अनेक अपडेट्स शेअर करत असतात, ज्यातून त्यांचे साधेपणा दिसून येतो. अशीच आपलं साधेपण जपणारी अभिनेत्री म्हणजे आश्विनी महांगडे.'आई कुठे काय करते' या मालिकेमधून घराघरांत पोहोचलेली अभिनेत्री अश्विनी महांगडे सोशल मीडियावर कायमच सक्रिय असते. सोशल मीडियावर ती तिचे अनेक फोटो व व्हिडीओ शेअर करत असते. याशिवाय तिच्या आयुष्यातल्या अनेक अपडेट्सही देत असते. अशातच तिने नुकताच शेअर केलेला एक व्हिडीओ सर्वांचं लक्ष वेधून घेत आहे. अश्विनीने शेअर केलेल्या या व्हिडीओ मध्ये ती शेतीकाम करत असल्याचे पाहायला मिळत आहे. शेतीकाम करतानाचा व्हिडीओ शेअर करत अश्विनीने तिच्या भावनाही व्यक्त केल्या आहेत. या व्हिडीखालील कॅप्शनमध्ये अश्विनी म्हणते,"शेती हा एक संस्कार आहे, पुढच्या पिढीला तो देणे गरजेचे आहे. आज मुलांच्या हातात मोबाईल आहे पण वेळ आली

तर स्वतःच्या पोटासाठी पिकवताही यायला हवे. मनगटात ताकद हवी आणि पाय जमिनीवर घट्ट रोवून उभे राहता यायला हवे."यापुढे तिने असं म्हटलं,"दुसऱ्यांना देण्याची दानत ही शेतकऱ्यांकडेच असते आणि हा गुण आपल्या मुलांनी घ्यायला हवा. आज रवी आणि वहिनींनी यासाठी मुलांना आमच्याकडे आणले. वेद आणि आर्या तर गुणी आहेतच, त्यांनी आनंदाने इवल्यश्या डोळ्यात सगळे साठवून घेतलं." अश्विनीने शेअर केलेल्या या व्हिडीओला चाहत्यांनी लाईक्स आणि कमेंट्सद्वारे चांगलाच प्रतिसाद दिला आहे.तसेच अभिनेत्रीच्या या साधेपणाचं कौतुकही केलं आहे. या व्हिडीओ खाली चाहत्यांनी "खरंच तुमचा खूप अभिमान आहे,"अभिनेत्री असूनही मदत म्हणून शेतात काम करतेस हेच तुझं मोठेपण आहे," "हे जपलं पाहिजे", "खूप छान," "म्हणूनच तुम्ही अभिनेत्री म्हणून आम्हाला आवडता", "उत्तम अभिनेत्री असण्याबरोबरच उत्तम माणूस कसं असावं हे तुमच्याकडून शिकण्यासारखं आहे.

## जुई गडकरीने दिलं खास गिफ्ट

'ठरलं तर मग' मालिकेचा चाहतावर्ग मोठ्या प्रमाणात आहे. ही सिरियल टीआरपीमध्ये देखील कायम अग्रेसर असते. या मालिकेतील सगळेच कलाकार गेल्या अडीच वर्षात घराघरांत लोकप्रिय झाले आहेत. यापैकी अर्जुनच्या सख्ख्या बहिणीची म्हणजेच अस्मिताची भूमिका साकारणाऱ्या मोनिका दबाडेने काही महिन्यांपूर्वीच ती आई होणार असल्याची गुडन्यूज प्रेक्षकांना दिली होती. फेब्रुवारी महिन्याच्या अखेरीस 'ठरलं तर मग' मालिकेतून मोनिकाने काही महिन्यांसाठी ब्रेक घेतला.अभिनेत्रीने लेकीचं नाव वृंदा असं ठेवलं आहे. मध्यंतरी 'ठरलं तर मग' मालिकेतील कल्पना म्हणजेच अभिनेत्री प्राजक्ता दिघे यांनी मोनिकासाठी लेकीच्या जन्मानंतर खास लाडू बनवून पाठवले होते. आता त्यांच्या पाठोपाठ मालिकेची मुख्य नायिका जुई गडकरीने सुद्धा वृंदाला खास गिफ्ट दिलं आहे.

## आयशाने दिलं चांगलंच उत्तर

बऱ्याच काळानंतर 'वॉंटेड' फेम अभिनेत्री आयशा टाकिया काही दिवसांपूर्वी मुंबई विमानतळावर दिसली होती. यादरम्यानचे अनेक व्हिडीओ सोशल मीडियावर व्हायरल झाले होते. पण आयशाच्या लूकवरून लोकांनी तिला ट्रोल केलं. "प्लास्टिक सर्जरी करून हिने स्वतःचा चेहरा बिघडवला', अशा आशयाच्या अनेक प्रतिक्रिया लोकांनी तिच्या व्हिडीओवर दिल्या होत्या. एवढंच नाहीतर लोकांनी तिला शरीर रचनेवरून ट्रोल केलं होतं. मात्र आता ट्रोलर्सला आयशाने चांगलंच उत्तर दिलं आहे.अभिनेत्री आयशा टाकियाने ट्रोल झाल्यानंतर सोशल मीडियावर भलीमोठी पोस्ट लिहिली आहे. आयशा म्हणाली, "मला हे सांगण्याची गरज आहे. दोन दिवसांपूर्वी माझ्या कुटुंबात मेडिकल इमरजेंसी असल्यामुळे गोव्याला निघाले होते. माझी बहीण हॉस्पिटलमध्ये आहे. यादरम्यान मला विमानतळावर काही पापाराझींना थांबवलं. त्यामुळे काही वेळात मी पापाराझींसाठी पोझ दिल्या. पण आपल्या देशात माझ्या लूकवर बोलण्याशिवाय इतर कोणतेही महत्त्वाचे मुद्दे नाहीत, असं मला वाटतं. अनेक जण बेताल मतं मांडत आहेत. मला कसं दिसायला पाहिजे होतं आणि कसं नाही याविषयी बोललं जात आहे. पण मला कुठलाही चित्रपट करण्यात किंवा पुन्हा कमबॅक करण्यात अजिबात रस नाही.



## अशी मिळाली अक्षयला 'जानवर'मधील भूमिका

अक्षय कुमार हा आज बॉलीवूडमधील प्रसिद्ध अभिनेता म्हणून ओळखला जातो. त्याचा चाहतावर्गही खूप मोठा आहे. पण, करिअरच्या सुरुवातीला मात्र अभिनेत्याच्या अनेक चित्रपटांना अपयश आलेलं. १९९७-१९९९ हा काळ असा होता, जेव्हा अक्षय कुमारने सर्वाधिक फ्लॉप चित्रपट दिलेले. पण, कलाकार म्हटलं की चढ-उतार येतच असतात. असंच काहीसं अक्षयबरोबरही झालं. अक्षय कुमारने 'जानवर' चित्रपटात बादशाह म्हणजेच बाबू लोहार ही भूमिका साकारली होती. या चित्रपटाने बॉक्स ऑफिसवर चांगलीच कमाई केली होती. महत्त्वाचं म्हणजे यातील अक्षय कुमारच्या कामाचं अनेकांनी कौतुक केलं होतं. पण, तुम्हाला माहीत आहे का? या चित्रपटासाठी अक्षय कुमार पहिली पसंती नव्हता, तर एक वेगळाच अभिनेता चित्रपटाचा नायक असणार होता. चित्रपटाचे दिग्दर्शक सुनील दर्शन यांनी 'इंडिया टुडे'ला दिलेल्या मुलाखतीमध्ये याबाबत सांगितलेलं. सुनील दर्शन म्हणाले, "या चित्रपटासाठी पहिली पसंती ही अभिनेता सनी देओलला होती. आम्ही चित्रपटाचं काम सुरू करणार होतो, पण तितक्यात आमचं त्याच्याबरोबर काही गोष्टींवरून वाद झाले. ते वाद आजही मिटलेले नाहीत, त्यामुळे मी ठरवलं की या चित्रपटासाठी दुसरा अभिनेता शोधू."मुख्य नायकाच्या शोधात असताना सुनील दर्शन यांनी अभिनेता अजय देवगणला यासाठी विचारलं. ते म्हणाले, "अजय व मी एका शनिवारी भेटून याबद्दल चर्चा केली आणि हा चित्रपट करायचं ठरलं. सोमवारी सगळं ठरवून कामाला सुरुवात करणारच होतो तेवढ्यात रविवारी सगळंच बदलून गेलं". सनी देओलसह वाद झाल्यानंतर सुनील यांनी अजय देवगण व काजोलबरोबर हा चित्रपट करण्याचा निर्णय घेतला होता. पण, त्याचदरम्यान या दोघांनी लग्न करण्याचा निर्णय घेतला. सुनील दर्शन यांना त्यादरम्यान अक्षय कुमाराचा फोन आला होता, ज्याला ते कधीच भेटले नव्हते. सुनील म्हणाले, "त्याने मला फोन करून म्हटलं, त्याला शक्य तितक्या लवकर मला भेटायचं आहे.

## नायिका उधळून लावणार खलनायिकांचा कट



'स्टार प्रवाह'वर यंदा वटपौर्णिमानिमित्त "महानायिकांची महावटपौर्णिमा" असा विशेष भाग दाखवला जाणार आहे. यानिमित्त वाहिनीवरील विविध मालिकेतील नायिका एकत्र आल्या आहेत. या विशेष भागाचं मालिकेतील नायक, नायिका आणि खलनायिका यांनी एकत्रित चित्रीकरण केलं आहे, त्यामुळे यंदा वटपौर्णिमेला प्रेक्षकांना हा विशेष भाग पाहता येणार आहे.जुई गडकरीने नुकतीच यानिमित्ताने एक मुलाखत दिली आहे. जुई 'स्टार प्रवाह'वरील 'ठरलं तर मग' या मालिकेत सायली हे पात्र साकारत आहे. यावेळी सायली वटपौर्णिमेनिमित्त पारंपरिक अंदाजात तयार झाली आहे, तर यावेळी सायलीने घेतलेल्या उखाण्याने लक्ष वेधलं आहे. तिने उखाणा घेत म्हटलं, "वटपौर्णिमेला पूजा होते ते झाड आहे वट, स्टार प्रवाहाच्या सर्व महानायिका उधळून लावणार खलनायिकांचा कट."'स्टार प्रवाह'वरील 'ठरलं तर मग', 'प्रेमाची गोष्ट', 'थोडं तुझं थोडं माझं','लग्नानंतर होईलंच प्रेम', 'येड लागलं प्रेमाचं' यांसारख्या इतर मालिकांमधील नायिकांनी एकत्र येत वटपौर्णिमेनिमित्त या खास भागाचं एकत्रित चित्रीकरण केलं आहे.
यावेळी त्यांच्याबरोबर वाहिनीवरील सर्व नायकही उपस्थित असून नायिकांवर आलेल्या संकटापासून ते त्यांच्या पत्नीची कशी रक्षा करणार हे पाहायला मिळणार आहे. दरम्यान, काही दिवसांपूर्वीच या सीनचं शूटिंग झालं असून, यावेळी सर्व नायक गुंडांशी एकहात करताना दिसले. हा सीन शूट करताना कलाकारांची कशी तारांबळ उडाली, याबाबत त्यांनी अनेक मुलाखतींमधून सांगितलं आहे. एकूणच यंदाची वटपौर्णिमाही मालिकाप्रेमींसाठी खास ठरणार आहे.

# विराट कोहलीविरुद्ध पोलीस तक्रार!

## चिन्नास्वामी मैदानाबाहेरील चेंगराचेंगरी प्रकरण

**।नवी दिल्ली।**
**प्रतिनिधी : महाईन्यूज।**

**बंगळुरूच्या चिन्नास्वामी स्टेडियमबाहेर ४ जून रोजी झालेल्या चेंगराचेंगरी प्रकरणी क्रिकेटपटू विराट कोहलीविरुद्ध शुक्रवारी पोलीस तक्रार दाखल करण्यात आली. रॉयल चॅलेंजर्स बंगळुरूने आयपीएलचे पहिले जेतेपद पटकावल्यानंतर विजयोत्सवाचे आयोजन करण्यात आले होते. त्यावेळी झालेल्या चेंगराचेंगरीत ११ जणांचा मृत्यू झाला होता.**



एएनआय या वृत्तसंस्थेने दिलेल्या माहितीनुसार, सामाजिक कार्यकर्ते एच. एम. वेंकटेश यांनी त्यांच्या तक्रारीत आरसीबीच्या पहिल्या आयपीएल विजयाच्या उत्सवादरम्यान झालेल्या चेंगराचेंगरीसाठी विराट कोहलीला जबाबदार धरले आहे. मात्र, त्यांच्या तक्रारीवर अद्याप कोणताही एफआयआर नोंदवण्यात आलेला नाही. तत्पूर्वी कर्नाटक पोलिसांनी चेंगराचेंगरीबाबत दाखल केलेल्या एफआयआरमध्ये नमूद केले आहे की, आरोपी आरसीबी फ्रँचायझी, इव्हेंट मॅनेजमेंट फर्म डीएनए, आणि कर्नाटक राज्य क्रिकेट संघटनेने आवश्यक परवानगीशिवाय विजयोत्सवाचे आयोजन केले होते.दरम्यान, चेंगराचेंगरीच्या घटनेबाबत क्यूबन पार्क पोलीस ठाण्यात आणखी दोन गुन्हे दाखल करण्यात आले आहेत. चेंगराचेंगरीत जखमी झालेल्या आणि रुग्णालयात उपचार घेत असलेल्या रोलँड गोम्स यांनी दाखल केलेल्या तक्रारीवरून, आरसीबी फ्रँचायझी, केएससीए आणि डीएनए विरुद्ध भारतीय न्याय संहितेच्या कलम १२५(अ) अंतर्गत गुन्हा दाखल करण्यात आला आहे.दाखल केलेल्या तक्रारीत गोम्स यांनी म्हटले आहे की, “मी सोशल मीडियावर आरसीबीची पोस्ट पाहिली आणि माझ्या मित्रांसह विजयोत्सव पाहण्यासाठी आलो होते. जेव्हा मी गेट क्रमांक १७ मधून आत जात होतो तेव्हा प्रचंड गर्दी होती आणि त्यावेळी माझ्या खांद्याचा सांधा निखळला.”दरम्यान, भाजपच्या एका शिष्टमंडळाने क्यूबन पार्क पोलीस स्टेशनला भेट देत मुख्यमंत्री सिद्धरामय्या आणि उपमुख्यमंत्री डी.के. शिवकुमार यांच्याविरुद्ध एफआयआर नोंदवण्याची मागणी करणारी तक्रार दाखल केली आहे.तक्रार दाखल केल्यानंतर माध्यमांशी बोलताना भाजपाचे आमदार एन. रविकुमार म्हणाले की, “आरसीबी विजयोत्सवादरम्यान झालेल्या चेंगराचेंगरीमुळे झालेल्या मृत्यू आणि त्यामुळे झालेल्या गोंधळाची जबाबदारी मुख्यमंत्री आणि उपमुख्यमंत्र्यांनी घ्यावी अशी माझी मागणी आहे. जर त्यांच्यात नैतिकता, संविधान आणि लोकशाहीचा आदर असेल तर त्यांनी राजीनामा द्यावा.”त्यांनी पुढे या सर्व प्रकारासाठी सरकार, मुख्यमंत्री आणि उपमुख्यमंत्री जबाबदार असल्याचा आरोप केला आहे. दरम्यान या चेंगराचेंगरीत ११ लोकांचा मृत्यू झाला असून ५० ते ६० लोक जखमी झाले आहेत.एएनआय या वृत्तसंस्थेने दिलेल्या माहितीनुसार, सामाजिक कार्यकर्ते एच. एम. वेंकटेश यांनी त्यांच्या तक्रारीत आरसीबीच्या पहिल्या आयपीएल विजयाच्या उत्सवादरम्यान झालेल्या चेंगराचेंगरीसाठी विराट कोहलीला जबाबदार धरले आहे. मात्र, त्यांच्या तक्रारीवर अद्याप कोणताही एफआयआर नोंदवण्यात आलेला नाही.

### चेंगराचेंगरीत 11 लोकांचा मृत्यू

.तत्पूर्वी कर्नाटक पोलिसांनी चेंगराचेंगरीबाबत दाखल केलेल्या एफआयआरमध्ये नमूद केले आहे की, आरोपी आरसीबी फ्रँचायझी, इव्हेंट मॅनेजमेंट फर्म डीएनए, आणि कर्नाटक राज्य क्रिकेट संघटनेने आवश्यक परवानगीशिवाय विजयोत्सवाचे आयोजन केले होते.जेव्हा मी गेट क्रमांक १७ मधून आत जात होतो तेव्हा प्रचंड गर्दी होती आणि त्यावेळी माझ्या खांद्याचा सांधा निखळला.”दरम्यान, भाजपच्या एका शिष्टमंडळाने क्यूबन पार्क पोलीस स्टेशनला भेट देत मुख्यमंत्री सिद्धरामय्या आणि उपमुख्यमंत्री डी.के. शिवकुमार यांच्याविरुद्ध एफआयआर नोंदवण्याची मागणी करणारी तक्रार दाखल केली आहे.तक्रार दाखल केल्यानंतर माध्यमांशी बोलताना भाजपाचे आमदार एन. रविकुमार म्हणाले की, “आरसीबी विजयोत्सवादरम्यान झालेल्या चेंगराचेंगरीमुळे झालेल्या मृत्यू आणि त्यामुळे झालेल्या गोंधळाची जबाबदारी मुख्यमंत्री आणि उपमुख्यमंत्र्यांनी घ्यावी अशी माझी मागणी आहे.

# श्रेयसनं मारलेला तो फटका गुन्हा!

## युवराज सिंगच्या वडिल योगराज सिंग यांची कारवाईची मागणी!

**।नवी दिल्ली।**
**प्रतिनिधी : महाईन्यूज।**

**मंगळवारी ३ जून रोजी अहमदाबादमधील नरेंद्र मोदी स्टेडियमवर आयपीएल २०२५ चा अंतिम सामना झाला. यात RCB अर्थात रॉयल चॅलेंजर्स बँगलोरनं पंजाब किंग्जचा अवघ्या ६ धावांनी पराभव केला. गेल्या १८ वर्षांत पहिल्यांदाच आरसीबीला आयपीएलचं विजेतेपद जिंकण्यात यश आलं. मात्र, दुसरीकडे आता PBKS च्या पराभवाची कारणं शोधली जात आहेत.**

एकेकाळी पंजाब किंग्जचा कर्णधार व प्रमुख खेळाडू असणाऱ्या युवराज सिंगच्या वडिलांनी या पराभवासाठी कर्णधार श्रेयस अय्यरनं मारलेल्या एका फटक्याला दोषी धरलं आहे. आयपीएलच्या अंतिम सामन्यात पहिली फलंदाजी करताना आरसीबीनं पंजाब किंग्जसमोर विजयासाठी १९१ धावांचं लक्ष्य ठेवलं. आयपीएल अंतिम सामन्यातली ही आजपर्यंतची दुसरी मोठी धावसंख्या होती. त्यामुळे सामना दोन्ही बाजूंनी बरोबरीच्या पातळीवर असल्याचं बोललं जात होतं. पंजाबनं सुरुवात देखील आश्वासक करत विजेतेपदावर आपला दावा असल्याचं स्पष्ट केलं. पण पंजाबचे खेळाडू ठराविक काळानंतर बाद होत गेले. शेवटच्या षटकात विजयासाठी २९ धावा आवश्यक असताना शशांक सिंगनं तुफान फटकेबाजी करून सामना अगदी काठावर नेऊन ठेवला.शेवटच्या षटकात पंजाबला फक्त २२ धावा करता आल्या. त्यामुळे RCB च्या विजयावर शिक्कामोर्तब झालं. पण या सर्व घडामोडींमध्ये आता कर्णधार श्रेयस अय्यरच्या खेळीची चर्चा होऊ लागली आहे.




युवराज सिंगचे वडील व माजी क्रिकेटपटू योगराज सिंग यांनी या पराभवासाठी श्रेयस अय्यरला दोषी धरलं आहे. श्रेयसनं मारलेला एक चुकीचा फटका पंजाबच्या पराभवासाठी कारणीभूत ठरल्याचा दावा करतानाच योगराज सिंग यांनी श्रेयसवर या चुकीसाठी दोन सामन्यांची बंदी घातली जावी, अशी भूमिका घेतली आहे.श्रेयस अय्यरनं अंतिम सामन्यात फलंदाजी करताना खेळलेला फटका हा माझ्यामते मोठा गुन्हा आहे. अशोक मंकडनं मला या गुन्ह्याबद्दल सांगितलं होतं. हा गुन्हा कलम ३०२ नुसार शिक्षेस पात्र ठरतो. मंकडनं मला या गुन्ह्याचे परिणामही सांगितले होते. त्यानुसार, अशा खेळाडूवर दोन सामन्यांची बंदी घातली जायला हवी. श्रेयस अय्यरनं अंतिम सामन्यात जे केलं, ते अजिबात स्वीकारार्ह नाही. या चुकीला माफी नाही”, अशा शब्दांत योगराज यांनी त्यांचा संताप व्यक्त केला आहे. फटका पंजाबच्या पराभवासाठी कारणीभूत ठरल्याच्या संदर्भात हे विधान केलं असून तो फटका मारणं हा त्याचा गुन्हाच असल्याचं त्यांनी नमूद केलं आहे.

### काय झालं IPL च्या अंतिम सामन्यात?

जॉश इंग्लिसनंही ३९ धावांचं महत्त्वाचं योगदान दिलं. मात्र, यंदाच्या आयपीएलमध्ये पंजाबचा भरंवशाचा फलंदाज खुद्द कर्णधार श्रेयस अय्यर मात्र अवघ्या दोन चेंडूंमध्ये एक धाव बाद झाला. चेंडू थर्ड मॅनच्या दिशेने एकेरी धावेसाठी मारण्याच्या प्रयत्नात श्रेयस अय्यर यष्टीरक्षक रोमारियो शेफर्डकडे झेल देऊन बाद झाला.

स्मार्ट PCMC
SMART CITY

# महाईन्यूज™

ePaper

।शनिवार ।
।दि. 7 जून 2025।

epaper.mahaenews.com

पिंपरी-चिंचवड, मावळ आवृत्ती





Priyadarshani
SCHOOL & JR. COLLEGE
ALANDI
PRIYADARSHANI GROUP OF SCHOOLS
42
Years of Excellence in Education
EDUCATING MIND & HEART
ADMISSIONS OPEN
FOR AY 2025-26
Holistic Empowering Learning
IT ALL STARTS HERE
42
YEARS OF ENRICHING EXPERIENCE OF EDUCATION
55+
NATIONAL & INTERNATIONAL AWARDS ACROSS OUR SCHOOLS
11+
CAMPUSES IN AND AROUND PUNE, MAHARASHTRA
17K+
17,000 STUDENTS ACROSS CAMPUSES
600+
TEACHING AND NON TEACHING STAFF
13K+
13,000 ALUMNI ACROSS GLOBE
PRIYADARSHANI GROUP OF SCHOOLS
BHOSARI | INDRAYANI NAGAR | MOSHI | CHAKAN | ALANDI | SHIVAJINAGAR | NANEKARWADI | WANOWRIE | SATARA
+91 8668755826
alandi@priyadarshanischools.org
www.priyadarshanischools.org




95277 64646 / 77967 67292


Express
Media Enterprises
Professional Live set up with live drone available..
• Documentary
• Weddings
• Drone
• Motion Graphics
• Testimonials
• Tutorial videos
• Product Videos
• Animation
• Social Media Content
• Promotional Videos
• Real Estate
• Corporate
• Advertising
• Events
PUNE
Contact: 9657767000/9370493922/9664188046